## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०३/२०१७

**१) ट्रकचालकांच्या निष्काळजीपणामुळे, टाटा सफारी या गाडीला धडक देवुन एका इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०२/०३/२०१७ चे ०५.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपल्या चार चाकी टाटा ४०७ या गाडीने दुध घेवुन सिहोरा मार्ग तुमसर कडे जात असता समोरून येणाऱ्या आरोपी ट्रक चालकाने आपले ताब्यातील वाहन लापरवाहीने व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीचे गाडीस धडक देवुन फिर्यादीस जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी कार्तीक प्रेमलाल तुमसरे २३ वर्ष रा. रणेरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १३४ (ब) १८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**२) येण्याजाण्याच्या रस्त्यावर बैलबंडी आडवी करून शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २/०३/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादीचे आरोपी चे घरा समोरून घरी येण्या जाण्याचा मार्ग असुन यातील आरोपीने फिर्यादीचे येण्या जाण्याच्या रस्त्यावर बैलबंडी आडवी ठेवुन येण्याजाण्यास अडथळा केला तेव्हा फिर्यादीने आरोपीस हटकले असता आरोपीने भांडन शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३४१,५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करून गाडीच्या मागे जावुन रस्त्यावर गाडीखाली पाडुन जबरीने सोन्याची चैन हिसकावुन,चाकुचा धाक दाखवुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २/०३/२०१७ चे १५.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले मैत्रीन कु. निकीता हिम्मंत कापगते रा. प्रगती कॉलोनी साकोली हिचे सोबत बारावीचा पेपर देवुन प्लेजर एमएच ३६ यु १२२५ ने सेंदुरवाफा ते उमरी कडे जाणाऱ्या जिल्हा मार्गाने उमरी येथे जात असतांना यातील अनोळखी तीन ईसमाने संगनमत करून तोंडावर स्कार्प बांधुन होंन्डा शाईन मोटार सायकलने फिर्यादीचे गाडीजवळ येवुन गाडी थांबविण्यास भाग पाडुन फिर्यादी ही मागे बसली असल्याने तीला गाडीवरून ओढुन खाली पाडुन तसेच मैत्रीनीला सुध्दा खाली पाडुन फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन किंमती २४,०००/—रू. ची जबरीने ओढुन चैन ओढतांनी फिर्यादीचे गळयाला जखम करून तसेच फिर्यादीचे मैत्रीनीला गाडीचे खाली पाडुन जखमी करून फिर्यादी ही त्या आरोपीचे मागे धावली असता तीला चाकुचा धाक दाखवुन परतऊन लावुन आपल्या मोटार सायकलने अनोळखी आरोपीतांनी सोन्याची चैन घेवुन पळुन गेल्याने फिर्यादी कु. रश्मि शिवशंकर कापगते वय १६ वर्ष रा उमरी हीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सोकोली येथे कलम ३९२,३९७,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०२/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, पवनी, करडी व लाखांदुर येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १८ लिटर हातभटटी दारु किंमती ९००/—रु. व देशी दारु २ लिटर ७०० मिली लिटर किंमती ७५०/—रु. असा एकुण किंमती १,६५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.